आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -रात्री ८.०५ वाजता

१९ डिसेंबर २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड यांच्याविरुद्ध दाखल झालेला अविश्वास प्रस्ताव उपाध्यक्षांनी फेटाळला

- संसद भवन परिसरात आंदोलनादरम्यान झालेल्या धक्काबुक्कीवरुन भाजपा आणि काँग्रेसकडून परस्परांविरोधात गुन्हे दाखल

- जम्मू आणि काश्मीरमध्ये सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत पाच दहशतवादी ठार

**आणि**

- आगामी २ वर्ष भारत आणि पाकिस्तान दरम्यान होणारे क्रिकेट सामने त्रयस्थ देशात खेळवण्याचा ICC चा निर्णय

**<><><><><>**

राज्यसभेचे अध्यक्ष, उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या विरुद्ध दाखल झालेला अविश्वास प्रस्ताव उपाध्यक्ष हरिवंश यांनी फेटाळला आहे. अध्यक्ष धनखड पक्षपात करत असल्याचा आरोप करुन विरोधकांनी हा अविश्वास प्रस्ताव मांडला होता. तो घाईघाईने, कसातरी आणि केवळ अध्यक्षांचं प्रतिमा-हनन करण्यासाठी मांडला गेल्याची प्रतिक्रीया हरिवंश यांनी फेटाळताना दिली. हा प्रस्ताव देताना निर्धारित कालावधीचं पालन केलं नाही तसंच त्यासाठी पुरेसं संख्याबळ नव्हतं. या प्रस्तावामुळे संवैधानिक संस्थांचंही हनन होत असल्याचं ते म्हणाले. १० डिसेंबर रोजी किमान ६० सदस्यांच्या स्वाक्षरीने हा प्रस्ताव मांडण्याची नोटीस देण्यात आली होती.

**<><><><><>**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केलेल्या विधानावरुन आज सलग दुसऱ्या दिवशी संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे गदारोळ झाला. घोषणाबाजीमुळे कामकाज सुरुवातीला दुपारी दोन वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

त्यापूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या समर्थनार्थ, तसंच काँग्रेसनं बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान केल्याचा आरोप करत भाजप खासदारांनी आज संसदेच्या आवारात निदर्शनं केली.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी माफी मागावी अशी मागणी करत काँग्रेस, द्रमुक, समाजवादी पक्ष, राष्ट्रीय जनता दल, डावे पक्ष आणि इतर पक्षांच्या खासदारांनी संसद परिसरात मोर्चा काढला. या निदर्शनांमधे धक्काबुक्की होऊन भाजपाचे प्रताप सरंगी आणि मुकेश राजपूत जखमी झाले. त्यांना तात्काळ उपचारांसाठी रुग्णालयात नेण्यात आलं. आपल्याला राहुल गांधी यांचा धक्का लागल्याचा आरोप सरंगी यांनी केला आहे. संसदीय कार्य मंत्री किरेन रिजिजू यांनी या प्रकाराचा तीव्र शब्दात निषेध केला आहे. या धक्काबुक्कीत आपल्यालाही इजा झाल्याचं कांग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सांगितलं. या प्रकाराची सविस्तर चौकशी करण्याची मागणी त्यांनी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्याकडे केली.

**<><><><><>**

संसद भवन परिसरात आंदोलनादरम्यान झालेल्या धक्काबुक्कीवरुन भाजपा आणि काँग्रेसने परस्परांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत. भाजपानं निदर्शनादरम्यान पक्षाचे दोन खासदार जखमी झाल्यावरुन काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याविरुद्ध दिल्ली पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे, असं खासदार अनुराग ठाकूर म्हणाले.

काँग्रेस खासदारांच्या शिष्टमंडळाने भाजपाविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. संसदेच्या मकर द्वारपर्यंत काँग्रेसतर्फे काढण्यात आलेल्या निषेध मोर्चा दरम्यान

मकर द्वार इथं जमलेल्या भाजप नेत्यांनी गोंधळ घातला. यावेळी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे जखमी झाले असल्याचं काँग्रेस नेते दिग्विजय सिंह यांनी म्हटलं आहे.

<><><><>

संसदभवन परिसरात काँग्रेसचे नेते राहूल गांधी यांनी रालोआच्या खासदारांशी गैरवर्तणूक केल्याचा आरोप भाजपाने केला आहे. भाजपाच्या मुख्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना भाजपाचे नेते आणि केंद्रीय मंत्री शिवराज सिंग चौहान यांनी लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी प्रताप सारंगी आणि मुकेश राजपूत या दोन भाजपा खासदारांना निदर्शनादरम्यान जखमी केल्याचा आरोप केला. याशिवाय राहूल गांधी यांनी भाजपाच्या राज्यसभा खासदार फंगॉन कोन्याक यांच्याशीही वाईट वर्तन केल्याची तक्रार कोन्याक यांनी राज्यसभेच्या अध्यक्षांकडे केल्याचं चौहान यांनी यावेळी सांगितलं.

केंद्रीय गृहमंत्र्यांचं डॉ. आंबेडकर यांच्याविषयीचं वक्तव्य तसंच अदानी समुहावरचे लाचखोरीचे आरोप अशा मुद्द्यांना या प्रकरणातून भाजपा बगल देण्याचा प्रयत्न करत आहे, असा दावा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला. भाजपाचे खासदार संसद भवनाच्या प्रवेशद्वार अडवून उभे होते आणि त्यांनी आपल्याला आत जाऊ दिले नाही, असंही ते म्हणाले.

<><><><>

हरीत महामार्ग धोरण २०१५ अनुसार राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांवर काम सुरु झाल्याचं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी लोकसभेत सांगितलं. राष्ट्रीय महामार्गांवर बासष्ठ हजार किलोमीटरपेक्षाही अधिक पट्ट्यावर रोपं लावण्याचं काम सुरु झालं आहे.

<><><><>

भारतामध्ये विमानभाडं हे बहुतेक देशांपेक्षा कमी असल्याचं नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी म्हटलं आहे. लोकसभेत एका लेखी उत्तरात त्यांनी ही माहिती दिली. नागरी विमान वाहतूक महासंचालनालयानं निर्माण केलेल्या विमान भाड्यावर लक्ष ठेवणाऱ्या विभागानं देशातल्या आणि परदेशातल्या विविध मार्गांवरच्या विमानभाड्यांचे तुलनात्मक विश्लेषण केलं आहे. भारतीय विमान कंपन्यांचे प्रति किलोमीटर विमानभाडं कमी असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. २०२३ च्या तुलनेत २०२४ मध्ये विमानभाड्यात घट झाली असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

भारतीय पासपोर्टधारकांना २६ देशांमध्ये व्हिसामुक्त प्रवेश असून ४० देशांमध्ये व्हिसा ऑन अरायव्हलची सुविधा असल्याचं सरकारनं म्हटलं आहे. परराष्ट्र राज्यमंत्री कीर्ती वर्धन सिंह यांनी राज्यसभेत एका लेखी उत्तरात ही माहिती दिली. नेपाळ, भूतान आणि मालदीवच्या नागरिकांना भारतात व्हिसा-मुक्त प्रवेश आहे.

<><><><><>

बांगला देशात हिंदू आणि इतर अल्पसंख्याकांवर हल्ले होत असल्याच्या वृत्तांची गंभीर दखल घेतली असल्याचं केंद्रसरकारने आज राज्यसभेत सांगितलं. परराष्ट्र व्यवहार राज्य मंत्री कीर्तीवर्धन सिंग यांनी एका लेखी उत्तरात सांगितलं यासंदर्भात ८८ गुन्हे दाखल झाले असून सुमारे ७० जणांना बांगलादेश पोलिसांनी अटक केली आहे. तिथल्या नागरिकांच्या सुरक्षा आणि स्वातंत्र्याची जबाबादारी बांगला देश सरकारची आहे. आणि बांग्लादेश सरकार याप्रकरणी योग्य पावलं उचलेल, अशी भारताची अपेक्षा असल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

राज्यातल्या, शेतकरी, युवा वर्ग, ज्येष्ठ नागरिक, वंचित घटकांना दिलेली आश्वासनं पूर्ण केली जातील. शासनाच्या सुरु असलेल्या योजना बंद होऊ देणार

नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत दिली. राज्यपालांच्या अभिभाषणावरच्या चर्चेला ते उत्तर देत होते. ते म्हणाले...

**होल्ड - बाईट - देवेंद्र फडनवीस ( १६ सेकंद)**

लाडकी बहीण योजनेतल्या अपात्र लाभार्थ्यांना काढून टाकण्याचे सुतोवाचही त्यांनी केलं. शेतकऱ्यांकडून विजेचे बिल घेणार नाही, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

उरण इथे काल झालेल्या बोट अपघाताचा तपास करण्यासाठी भारतीय नौदलाने विशेष चौकशी समितीची स्थापना केली आहे. गेटवे ऑफ इंडियावरून काल एलिफंटाला निघालेल्या बोटीला उरण इथे अपघात झाला आणि त्यात १३ जण मृत्युमुखी पडले.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली आज नवी दिल्लीत उच्चस्तरीय सुरक्षा बैठक झाली. या बैठकीत गंभीर सुरक्षा प्रश्नांवर, विशेषतः जम्मू कश्मिरमधल्या परिस्थितीवर भर देण्यात आला. जम्मू कश्मिरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा, मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्यासह वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

जम्मू आणि काश्मीरच्या कुलगाम जिल्ह्यात आज सकाळी सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत पाच दहशतवादी ठार झाले. हे दहशतवादी प्रतिबंधित दहशतवादी संघटना हिजबुल मुजाहिदीनचे सदस्य असून कुलगाम जिल्ह्यातल्या वेगवेगळ्या भागातले रहिवासी होते. यात भारतीय लष्कराचे दोन जवानही जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

**<><><><>**

पुढच्या वर्षी पाकिस्तानात होणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारत आणि पाकिस्तान दरम्यान होणारे सामने त्रयस्थ देशात खेळवले जाणार असल्याचं आयसीसीनं स्पष्ट केलं आहे. ही स्पर्धा पाकिस्तानात आणि इतर ठिकाणी अशी हायब्रिड पद्धतीनं खेळवली जाणार आहे. भारतामध्ये पुढच्या वर्षी होणाऱ्या महिला क्रिकेट विश्वचषक आणि २०२६ मध्ये भारत आणि श्रीलंकेने आयोजित केलेल्या पुरुष टी-ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेसाठी देखील हा निर्णय लागू असेल असं आयसीसीनं म्हटलं आहे.

**<><><><>**

आकाशवाणीनं आज नवी मुंबईत वाशी इथं प्रमुख भारतीय भाषांमधल्या कवितांचे कवी संमेलन आयोजित केलं आहे. मुंबई विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक करुणाशंकर उपाध्याय सर्वभाषा कवि सम्मेलनाच्या अध्यक्षस्थानी होते. देशात भौगोलिक, सांस्कृतिक विविधता असतानाही सर्वांना एका सूत्रात बांधण्यासाठी कविता महत्वाची ठरते असं मत त्यांनी यावेळी व्यक्त केलं. आकाशवाणीच्या वतीनं मुंबईत पहिल्यांदाच हे संमेलन होत आहे. देशभरातले २३ कवी आणि अनुवादक यात सहभागी झाले आहेत. आकाशवाणीच्या देशभरातल्या केंद्रावरून स्थानिक भाषांमध्ये २५ जानेवारी रोजी या कवितांचं प्रसारण होणार आहे.

**//<><><><><>//**